महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ ०६ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १९१ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

संपादकीय

## प्रचाराची रणधुमाळी

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरांमध्ये प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. घोषणाबाजी, रॅल्या, सोशल मीडियावरील प्रचार आणि आरोप-प्रत्यारोप यांमुळे राजकीय वातावरण तापले आहे. मात्र या गदारोळात शहरांच्या मूलभूत प्रश्नांवर—पाणी, वाहतूक, कचरा व्यवस्थापन, आरोग्य, शिक्षण आणि पारदर्शक कारभार—यावर किती गांभीर्याने चर्चा होते, हा खरा प्रश्न आहे. उमेदवारांची निवड करताना अनेक पक्षांनी आर्थिक बळाला प्राधान्य दिल्याचे चित्र दिसते. कोट्याधीश उमेदवारांची वाढती संख्या लोकशाहीतील समान संधीच्या तत्त्वाला आव्हान देणारी आहे. पैसा प्रचाराला वेग देतो, पण तो प्रशासनाला दिशा देऊ शकतो का, याचे उत्तर मतदारांनी शोधणे आवश्यक आहे. प्रचारातील भपकेबाजीपेक्षा कामगिरी, दृष्टिकोन आणि जबाबदारी महत्त्वाची ठरायला हवी. युती, मैत्रीपूर्ण लढती आणि बंडखोरी यांमुळे राजकीय गणिते बदलत आहेत. मात्र निवडणूक केवळ पक्षांची नसून शहराच्या भवितव्याची आहे. मतदारांनी व्यक्तीपूजा किंवा तात्कालिक आश्वासनांच्या पलीकडे जाऊन दीर्घकालीन विकासाचा विचार करणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील सर्वच पालिका निवडणुकीच्या प्रचारात विकासाच्या अनेक आश्वासनांचा पुनरुच्चार होत आहे. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, वाहतूक आणि आरोग्य सेवा यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर उमेदवार आणि पक्ष ठोस भूमिका मांडताना दिसत आहेत. यामुळे यावेळी तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराकडे गांभीर्याने पाहिले जात असल्याची आशा निर्माण झाली आहे. निवडणूक काळात मांडल्या जाणाऱ्या योजना जाहीरनाम्यापुरत्या न राहता अंमलबजावणीपर्यंत पोहोचतील, अशी अपेक्षा नागरिकांमध्ये आहे. आताचा मतदार अधिक जागरूक असून, केवळ आश्वासनांवर नव्हे तर काम करण्याची क्षमता, अनुभव आणि पारदर्शकतेकडे लक्ष देत आहेत. प्रचाराच्या रणधुमाळीत आवाज मोठे आहेत; आशय मात्र ठोस हवा. लोकशाहीचा उत्सव अर्थपूर्ण ठरवायचा असेल, तर मतदारांनी प्रश्न विचारले पाहिजेत आणि उमेदवारांनी उत्तरदायित्व स्वीकारले पाहिजे. शहर जिंकण्यापेक्षा शहर घडवणे हीच उमेदवारांची खरी कसोटी आहे.



## 'अंबरनाथ पॅटर्न' ने कमळ फुलणार

### भाजप जिल्हाध्यक्ष नंदू परब यांचा विश्वास

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांची युती मजबूत झाल्याचे चित्र आहे. मित्र पक्षासाठी जागा सोडत दोन्ही पक्षांतील इच्छुकांनी समन्वयाची भूमिका घेतल्याने महायुतीतील एकजूट अधोरेखित झाली आहे. बहुतांश प्रभागांत समन्वयाने उमेदवार उभे करण्यात आले असून, केवळ पॅनेल क्रमांक २९ मध्ये दोन्ही पक्षांमध्ये मैत्रीपूर्ण लढत होत आहे. या पॅनेलमध्ये शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप आमनेसामने असले तरी, युतीतील सलोखा कायम असल्याचे नेते स्पष्ट करीत आहेत. डोंबिवलीत 'अंबरनाथ पॅटर्न' राबवत भाजपचे कमळ फुलवले जाईल, असा विश्वास भाजपचे जिल्हाध्यक्ष नंदू परब यांनी व्यक्त केला आहे. स्थानिक पातळीवर संघटनात्मक ताकद आणि कार्यकर्त्यांचा उत्साह यामुळे या लढतीकडे विशेष लक्ष लागले आहे. दरम्यान, कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीत महायुतीच्या तब्बल २० जागा बिनविरोध निवडून आल्याने युतीची ताकद आधीच स्पष्ट झाली आहे. उर्वरित जागांवर विजय मिळवण्यासाठी दोन्ही पक्षांनी प्रचार यंत्रणा गतिमान केली असून, विकास, स्थैर्य आणि सक्षम नेतृत्वाच्या मुद्द्यावर महायुती निवडणुकीच्या मैदानात उतरली असल्याचे चित्र सध्या तरी दिसत आहे.

## इतर पक्षासाठी काम करायचं असेल तर राजीनामा द्या !

### रईस शेखांना समाजवादी पक्षाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

(प्रतिनिधी)

**भिवंडी : समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी इतर कोणत्याही पक्षासाठी काम करायचे असल्यास प्रथम आपल्या आमदारकीचा राजीनामा द्यावा, असा थेट इशारा समाजवादी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा निवडणूक प्रभारी अजय यादव यांनी दिला आहे. रईस शेख यांनी ५ जानेवारीपर्यंत रजा घेतली असून त्यानंतरच त्यांच्या राजकीय भवितव्याचा निर्णय होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.**

भिवंडी महानगर पालिका निवडणुकीसाठी समाजवादी पक्षाने भारतीय कम्युनिस्ट पक्षासोबत युतीची अधिकृत घोषणा केली आहे. वॉर्ड क्रमांक १५ मध्ये दोन्ही पक्ष संयुक्तपणे निवडणूक लढवणार असून, तिथे एक जागा कम्युनिस्ट पक्षाला सोडण्यात आली आहे. समाजवादी पक्षाने एकूण ६१ उमेदवारांना बी-फॉर्म वाटले असून, ५९ उमेदवार प्रत्यक्ष रिंगणात उतरले आहेत. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते विजय कांबळे यांनी या युतीचे स्वागत केले. समाजवादी आणि कम्युनिस्ट पक्षाची विचारसरणी समान आहे. जनतेचे प्रश्न प्रखरतेने मांडण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत, असे त्यांनी नमूद केले. काँग्रेस सोडून समाजवादी पक्षात सामील झालेले अनस अन्सारी यांची भिवंडी शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अन्सारी यांनी आगामी निवडणुकीत समाजवादी पक्षाचे सर्वाधिक उमेदवार निवडून येतील, असा विश्वास व्यक्त केला. तर समाजवादी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष रईस शेख हे अधिकृतपणे सपाचे आमदार आहेत; मात्र पक्षाच्या ध्येयधोरणांविरुद्ध जाऊन जर ते दुसऱ्या पक्षासाठी काम करणार असतील, तर त्यांना पदाचा राजीनामा द्यावाच लागेल, असेही निवडणूक प्रभारी अजय यादव यांनी म्हटले.

## एकनाथ शिंदेंच्या प्रचार रॅलीला ठाण्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

(मुख्य वार्ताहर)

**ठाणे :** ठाणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी रात्री काढलेल्या प्रचार रॅलीला नागरिक व कार्यकर्त्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. सिडको, टेंभीनाका, कोर्टनाका, नितीन कंपनी परिसरासह रॅली मार्गावर उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. ही रॅली सिडको येथील चेंदणी कोळीवाडा, राघोबा शंकर रोड येथून सुरू होऊन टेंभीनाका, चंदनवाडी, सिद्धेश्वर तलाव, ज्ञानेश्वर नगर, लोकमान्य नगर डेपो, भीमनगर, वर्तकनगर, मानपाडा मनोरमानगर अशा प्रमुख भागांतून मार्गक्रमण करत होती. रॅलीमध्ये शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



शहरातील अरुंद रस्ते आणि मोठ्या प्रमाणातील सहभागामुळे काही ठिकाणी वाहतूक संथ झाली असली, तरी नागरिकांनी संयम राखत परिस्थितीला सहकार्य केले. वाहतूक पोलिसांनीही पर्यायी मार्गांची व्यवस्था करत वाहतूक सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न केला. प्रचार रॅलीमुळे शहरात निवडणुकीचे वातावरण अधिक तापले असून, महापालिका निवडणुकीत शिंदे गटाची ताकद दाखवणारा हा शक्तिप्रदर्शनाचा कार्यक्रम ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

ठाणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढलेली प्रचार रॅली म्हणजे संघटनशक्ती आणि नेतृत्वाचा ठळक प्रत्यय होता. शहरातील प्रमुख भागांतून गेलेल्या या रॅलीत कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती दिसून आली, ज्यातून शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना-भाजप युतीची ताकद अधोरेखित झाली. निवडणुकीच्या रणधुमाळीत शिंदे यांनी थेट मैदानात उतरून कार्यकर्त्यांना दिशा दिल्याचे चित्र या रॅलीतून स्पष्ट झाले.




महत्वाचे

## कल्याण-डोंबिवली मनपा लोकशाहीच्या उत्सवासाठी सज्ज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्रतिनिधी/दि.5

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी महापालिकेने जय्यत तयारी केली असून प्रभागनिहाय मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. एकूण १६०४ मतदान केंद्रांवर आणि एकूण ३९२ लोकेशन्सवर मतदानाची प्रक्रिया संपन्न होणार आहे. यापैकी तळ मजल्यावर १०५५ मतदान केंद्र, पहिल्या मजल्यावर ९ मतदान केंद्र, पार्टिशन स्वरुपात ४८२ मतदान केंद्र आणि मंडपात ५८ मतदान केंद्र राहतील. यापैकी १६ ठिकाणी १० पेक्षा जास्त मतदान केंद्र ठिकाणे असणार आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी- १ यांचे निवडणूक प्रभागांत ५५, निवडणूक निर्णय अधिकारी- २ यांचे निवडणूक प्रभागांत ४७, निवडणूक निर्णय अधिकारी- ३ यांचे निवडणूक प्रभागांत ४०, निवडणूक निर्णय अधिकारी- ४ यांचे निवडणूक प्रभागांत २८, निवडणूक निर्णय अधिकारी- ५ यांचे निवडणूक प्रभागांत ४७, निवडणूक निर्णय अधिकारी- ६ यांचे निवडणूक प्रभागांत ४१, निवडणूक निर्णय अधिकारी- ७ यांचे निवडणूक प्रभागांत एकूण ४७, निवडणूक निर्णय अधिकारी- ८ यांचे निवडणूक प्रभागांत ४० व निवडणूक निर्णय अधिकारी ९ यांचे निवडणूक प्रभागांत एकूण ४७ लोकेशन्सवर मतदान प्रक्रिया संपन्न होईल.

वृद्ध मतदार, दिव्यांग मतदार, गर्भवती महिला इत्यादींना मतदान करणे सोयीचे व्हावे यासाठी तळमजल्यावर जास्त प्रमाणात मतदान केंद्र ठेवण्यात आली आहेत. मतदानाचे वेळी रॅम्प, व्हीलचेअर इ. सुविधा आवश्यकतेनुसार मतदारांना पुरविल्या जाणार आहेत.

या सार्वत्रिक निवडणूकीसाठी पुरुष मतदारांची संख्या ७,४५,६६४, महिला मतदार संख्या ६,७८,८७० तर इतर मतदारांची संख्या ५५२ इतकी असून एकूण मतदारांची संख्या १४,२५,०८६ इतकी आहे.

## बिनविरोध निवडी म्हणजे पैसा आणि धाकदपटशाही

### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप

**महानगरपालिका निवडणुकीत महायुतीने आपले उमेदवार बिनविरोध निवडून आणल्याचा तीव्र निषेध काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला असून, या निवडी लोकप्रियतेमुळे नव्हे तर पैसा आणि धाकदपटशाच्या जोरावर झाल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महायुतीवर जोरदार टीका केली. "महानगरपालिका निवडणुकीत अनेक जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून येत असतील, तर ते लोकसमर्थनाचे लक्षण नाही. विरोधकांना अर्ज भरू न देणे, धमकावणे आणि आर्थिक दबाव टाकणे, या माध्यमातून ही बिनविरोध प्रक्रिया राबवली गेली आहे," असा आरोप सपकाळ यांनी केला.

महायुतीचे उमेदवार लोकप्रिय असल्यामुळे बिनविरोध निवडून आले, हा दावा सपकाळ यांनी फेटाळून लावत, "लोकप्रियतेचा कौल मतदानातून लागत असतो, दबावातून नाही," असे स्पष्ट केले.

### निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर सवाल; विधानसभा अध्यक्षांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांवरही भ्रष्टाचाराचे आरोप

यावेळी त्यांनी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कार्यालयात कार्यरत असलेल्या बहुतांश अधिकाऱ्यांवरही भ्रष्टाचाराचे आरोप केले. या संदर्भात अहवाल सादर करण्यात आला असतानाही निवडणूक आयोगाने अद्याप कोणतीही कारवाई केलेली नसल्याचे सांगत, आयोगाच्या निष्क्रियतेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

"अहवाल असूनही कारवाई होत नसेल, तर लोकशाही प्रक्रियेवरच संशय निर्माण होतो. निवडणूक आयोगाने तातडीने याची दखल घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी," अशी मागणी सपकाळ यांनी केली. महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे आरोप केवळ राजकीय नाहीत, तर लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांशी संबंधित असल्याचे सांगत, काँग्रेस या मुद्द्यावर रस्त्यावर उतरून लढा देईल, असा इशाराही त्यांनी दिला.

## उल्हासनगर महापालिकेत कोट्याधीशांचा मुकाबला!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर महापालिका निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू असून, सर्वच राजकीय पक्षांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. उमेदवार निवडताना पक्षांनी सामाजिक कार्यासोबतच आर्थिक स्थितीलाही प्राधान्य दिल्याचे चित्र असून, यंदाच्या निवडणुकीत अर्ध्याहून अधिक उमेदवार कोट्याधीश असल्याचे समोर आले आहे.

भाजपच्या हेमा पिंजानी यांच्याकडे तब्बल ९३ कोटी रुपयांची मालमत्ता असून, शिवसेना (शिंदे गट)चे राजेंद्र सिंग भुल्लर हे ५७ कोटींचे धनी आहेत. काँग्रेसचे विजय ठाकूर यांच्याकडे ३८ कोटींची मालमत्ता असल्याचे प्रतिज्ञापत्रातून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे यंदाची निवडणूक ही केवळ राजकीय नव्हे, तर आर्थिक ताकदीचीही लढत ठरत असल्याची चर्चा आहे. महापालिकेच्या सत्तेसाठी भाजप आणि शिंदे गट यांच्यात रस्सीखेच सुरू आहे. तर महाविकास आघाडीने सर्वच्या सर्व जागांवर उमेदवार उभे करत निवडणूक रंगतदार केली आहे.

काही प्रभागांत स्थानिक साई पक्ष आणि वंचित बहुजन आघाडीही प्रभावी ठरत आहेत. भाजप आणि शिंदेसेनेकडे सर्वाधिक कोट्याधीश उमेदवार असून, काँग्रेस, उद्धवसेना आणि मनसेकडे लखपती उमेदवारांची संख्या अधिक आहे.



# भिवंडीत पत्रकार दिन साजरा

## डॉ. किशोर पाटील यांचा गौरव



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा :** भिवंडी तालुक्यातील वळपाडा येथे पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पत्रकारांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

६ जानेवारी या पत्रकार दिनाचे औचित्य साधून मराठी दैनिक स्वराज्य तोरण व स्वराज्य तोरण चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने भिवंडी शहर व ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी विशेष सन्मान सोहळा ४ जानेवारी रोजी दैनिक स्वराज्य तोरण कार्यालय वळपाडा भिवंडी येथे घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन भिवंडी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव तथा चंद्रानंद कृषीपणन व समाजकल्याण यां संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. यशवंत अनंत म्हात्रे व स्वराज्य तोरणचे संपादक डॉ. किशोर बळीराम पाटील यांच्या शुभहस्ते करुन करण्यांत आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य आयोजक व संपादक डॉ. किशोर पाटील यांनी केले. विविध भाषिक पत्रकारांनी आपले मतभेद विसरून एकत्र येणे हीच पत्रकारितेची खरी ताकद असून, असा स्नेहमेळावा आयोजित करताना मनाला विशेष आनंद होत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी चंद्रानंद कृषीपणन व समाजकल्याण संस्थेच्या वतीने संपादक डॉ. किशोर पाटील यांना त्यांच्या सामाजिक व पत्रकारितेतील भरीव योगदानाबद्दल 'बाळशास्त्री जांभेकर' प्रेरणा पत्रकारिता पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. ठाणे, रायगड, पालघर जिल्ह्यांसह धुळे व नंदुरबारसारख्या आदिवासी दुर्गम भागात जाऊन आदिवासी ऊसतोड कामगारांसाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात येत असल्याचे डॉ. यशवंत म्हात्रे यांनी आपल्या भाषणात नमूद केले.या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार संध्याताई पवार, शरद भसाळे, फकरे आलम, संजय भोईर, आचार्य सुरजपाल यादव, मौलाना आसद काझमी तसेच डॉ. श्री. मनिलाल शिंपी (समन्वय अधिकारी – विभागीय समादेशक, आरएसपी) यांनी आपले मनोगत व्यक्त करून आयोजकांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. या कार्यक्रमास समाजसेवक डॉ. दिनेशभाई ठक्कर (संचालक, स्वामीनारायण हॉल), डॉ. निखिल चंदेरीया (संचालक, रोटी डे ग्रुप), धनराजसिंग राठोड (समाजसेवक, मुंबई) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या शुभहस्ते उपस्थित पत्रकारांना ब्लँकेट व भेटवस्तूं देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी भिवंडी शहर व ग्रामीण भागातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र पाटील यांनी केले, तर आभार आचार्य सुरजपाल यादव व अफसर खान यांनी मानले.

# 'हम हिंदुस्तानी': कृतज्ञतेचा एक 'लष्करी' सोहळा!

खरं तर, 3 जानेवारीची ती संध्याकाळ आमच्यासाठी केवळ एका 'कार्यक्रमाची' तारीख नव्हती, तर ती एका भारावलेल्या प्रतीक्षेची सांगता होती. मी आणि माझी पत्नी रोहिणी, गेल्या आठवड्याभरापासून एखाद्या सणासारखी या दिवसाची वाट पाहत होतो. ठीक पाच वाजता आम्ही ठाण्यातील 'श्री संत गजानन महाराज पाटेकर सभागृहात' पाऊल ठेवलं आणि तिथेच या कार्यक्रमाचं वेगळेपण जाणवलं. लष्करी शिस्त काय असते, याचा प्रत्यय कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच आला.

मेजर प्रांजल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक गोष्ट इतकी 'शार्प' आणि वेळेवर होती की, संरक्षण दलाची शिस्त आणि गांभीर्य आम्ही केवळ ऐकून होतो, त्या दिवशी ते प्रत्यक्ष अनुभवलं. कार्यक्रमाची सूत्रधार ज्योती हिने आपल्या नावाप्रमाणेच संपूर्ण सभागृहात प्रकाशाची लकेर पसरवली. तिचं निवेदन म्हणजे माणुसकी आणि आपुलकीचा एक सुंदर पूलच होता.

दिलीप गुप्ते सरांनी साध्या सोप्या भाषेत सैन्यदलाचा इतिहास, त्यांची रचना आणि पराक्रम मांडला, तर गायक कलाकारांनी आपल्या सुरांनी वातावरण भारून टाकलं. पण हे कलाकार! हे कोणी व्यावसायिक 'स्टार्स' नव्हते. किरण सुले, अनघा अधिकारी, मनिष कर्णिक, राजन गुप्ते, हेमंत रणदिवे, वासू फांसे, संजन गडकरी, शिवानी गडकरी आणि स्नेह प्रधान... हे सगळे अस्सल 'माणसं' होती. त्यांच्या गाण्यात एक विलक्षण प्रामाणिकपणा होता. मूळ गाण्याबद्दलचा आदर त्यांच्या स्वरातून ओसंडून वाहत होता. "आम्ही अजून शिकतोय" ही त्यांची साधी कबुलीच त्यांना प्रेक्षकांच्या काळजाच्या इतक्या जवळ घेऊन गेली की व्यावसायिक गायकही तिथे फिके पडले असते.

**कार्यक्रमातील गाणी आणि त्यासोबत उलगडलेले सैन्यदलाचे 'अंतरंग' काहीसे असे होते :**

**1. ताकत वतन की हमसे है :** संरक्षण दलाच्या भक्कम रचनेचा पाया जणू या गाण्यातून उलगडला.

**2. गर्जा महाराष्ट्र माझा :** 'आर्मीच्या प्रिन्सेस' आणि महाराष्ट्राच्या शौर्याची गाथा या सुरांनी गरगली.

**3. हर करम अपना करेंगे :** देशासाठी जगणं आणि मरणं म्हणजे काय, हे 'रँक्स आणि पोस्ट'च्या माहितीसह उमजलं.

**4. कंधो से मिलते है कंधे :** लष्कर, नौदल आणि वायुदलाच्या एकजुटीचं दर्शन या गाण्यातून घडलं.

**5. मेरा जूता है जपानी :** साध्या उपकरणांनी अद्ययावत शस्त्रास्त्रांवर कशी मात करता येते, हे ऐकून ऊर भरून आला.

**6. नैनो में बदरा छाये :** जवानांचा ऋतूंशी चाललेला लढा आणि अहोरात्र सराव या गाण्यातून समोर आला.

**7. साथी हाथ बढ़ाना :** नैसर्गिक आपत्ती असो वा शांती सेना, जवानांचा 'मदतीचा हात' किती मोलाचा असतो, हे यातून दिसलं.

**8. उस मुल्क की सरहद को :** इंटेलिजन्स आणि सीमा रक्षणाची जबाबदारी या गाण्याने अधोरेखित केली.

**9. जिंकू किंवा मरू :** युद्धाचे विविध प्रकार आणि त्यातील रणनीती या गाण्याने स्पष्ट केली.

**10. ऐ देश है वीर जवानो का :** आपल्या देशाच्या वीरांची शौर्यगाथा या गाण्याने पुन्हा जिवंत केली.

**11. ऐ मेरे वतन के लोगों :** भारतीय रेजिमेंट्सचा जाज्वल्य इतिहास या गाण्याने डोळ्यासमोर उभा केला.

**12. रोटी कपडा और मकान :** NDA मधील प्रशिक्षण आणि आता स्त्रियांचाही यातील सहभाग, हे ऐकून अभिमान वाटला.

**13. जरा सी आहट होती है :** शौर्यपदके आणि सन्मानाची गाथा या गाण्यातून उलगडली.

**14. संदेसे आते है :** हे गाणं सुरू झालं आणि सभागृह हेलावलं. सैन्यदलातील सेवा बजावताना जवान जेव्हा सीमेवर असतो, तेव्हा त्याच्या कुटुंबाची होणारी ओढाताण आणि तरीही त्यांचा असणारा खंबीर पाठिंबा या गाण्यातून उलगडला. केवळ उदरनिर्वाहासाठी नव्हे, तर समाजासाठी आपलं सर्वोत्तम योगदान देऊन एक जबाबदार नागरिक म्हणून जगण्याचा वसा या गाण्याने दिला.

**15. अल्लाह तेरो नाम:** सर्वधर्मसमभावाचे प्रतीक असलेले आपले सैन्य या गाण्यातून दिसले.

**16. प्यार बांटते चलो:** 'फ्लॅग डे'साठी केलेले आवाहन आणि मदतीची हाक या गाण्याने दिली.

**17. कर चले हम फिदा:** देशासाठी सर्वस्व अर्पण करण्याची भावना या गाण्याने प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी आणलं.

**18. छोड़ो कल की बातें:** नवीन भारताच्या उभारणीसाठी दिलीप गुप्ते सरांनी केलेले आवाहन या गाण्याने पूर्ण झाले.

प्रत्येक गाण्यानंतर सभागृहात निर्माण होणारं वातावरण हे केवळ एका कार्यक्रमाचं नव्हतं, तर एका 'कुटुंबाचं' होतं. प्रत्येक गाण्यागणिक प्रेक्षकांमधून येणाऱ्या घोषणा आणि "भारत माता की जय"च्या गर्जनांनी आसमंत दुमदुमून जात होता. निवडणुकांच्या धावपळीत असूनही आर.डी.सी. डॉ.संदीप माने आणि इतर शासकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती, त्यांचे जवानांबद्दलचे प्रेम आणि काळजी मनाला स्पर्शून गेली.

माजी सैनिकांचा केलेला सन्मान पाहून कृतज्ञतेने मन भरून आलं. "फ्लॅग डे म्हणजेच ध्वज दिन निधी" साठी लोकांनी दिलेला तात्काळ प्रतिसाद हा केवळ पैसा नव्हता, तर ती जवानांप्रति असलेली आपली भावना होती.आम्ही जेव्हा सभागृहाबाहेर पडलो, तेव्हा केवळ गाणी ऐकून बाहेर पडलो नव्हतो, तर एक नवी दृष्टी घेऊन बाहेर पडलो होतो. मेजर प्रांजल जाधव, दिलीप गुप्ते, हेमंत रणदिवे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने आम्हाला जो अभिमानाचा क्षण दिला, त्याबद्दल मी आणि रोहिणी त्यांचे मनापासून ऋणी आहोत. हा कार्यक्रम 'इंप्रेस' करण्यासाठी नव्हता, तर 'एक्स्प्रेस' करण्यासाठी होता आणि तो आमच्या काळजापर्यंत पोहोचला.

**- विजयकुमार कट्टी**

# रायगड जिल्ह्यात प्रथमच डिजिटल पेपरलेस शालेय बँक

## मायणी कोयना शाळेचा अभिनव उपक्रम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मायनी कोयना, केंद्र गागोदे बुद्रुक येथे विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेली पूर्णपणे डिजिटल व पेपरलेस शालेय बँक हा उपक्रम सध्या सर्वत्र कौतुकाचा विषय ठरत आहे. रायगड जिल्ह्यात प्रथमच अशा स्वरूपाची तंत्रस्नेही बँक शालेय स्तरावर कार्यान्वित करण्यात आली असून या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये बचतीची सवय, आर्थिक शिस्त व डिजिटल साक्षरता विकसित होत आहे. या शालेय बँकेचे वैशिष्ट्य म्हणजे तिचे संपूर्ण कामकाज डिजिटल पद्धतीने चालते. बँकेत शाखाधिकारी म्हणून इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी आर्या अमोल पवार जबाबदारी सांभाळत असून इतर विद्यार्थीही विविध जबाबदाऱ्या पार पाडत आहेत.




विद्यार्थ्यांनी डिजिटल सुविधेद्वारे पैसे जमा केल्यानंतर पालकांच्या मोबाईलवर त्वरित संदेश (SMS) जातो, तसेच एक लिंक पाठवली जाते. त्या लिंकद्वारे पालक घरबसल्या आपल्या पाल्याच्या खात्यात जमा झालेल्या रकमेची सविस्तर माहिती पाहू शकतात. याचबरोबर, एखाद्या खातेदार विद्यार्थ्याने बँकेतून कर्ज स्वरूपात रक्कम घेतल्यास, ज्या दिवशी परतफेड करायची आहे त्या दिवशी पालकांना आपोआप रिमाइंडर मेसेज पाठवला जातो. बँकेतील सर्व व्यवहारांची माहिती पीडीएफ स्वरूपात डाउनलोड करता येत असल्याने पारदर्शकता व विश्वासार्हता अधिक वाढली आहे. या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये बचतीची आवड निर्माण झाली आहे. अनेक विद्यार्थी बाहेरचे आरोग्याला हानिकारक ठरणारे खाऊ न खाता ते पैसे बँकेत जमा करत असल्याने पालकांमध्येही समाधान व्यक्त केले जात आहे. आर्थिक व्यवहारांची समज, नियोजन, जबाबदारी आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण विद्यार्थ्यांना या बँकेमुळे मिळत आहे. हा उपक्रम तंत्रस्नेही शिक्षक रामकृष्ण भोईर यांच्या कल्पकतेतून साकार झाला आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे व शिक्षक अमित महागावकर, मंगेश पाटील यांच्या सहाय्याने शालेय स्तरावर डिजिटल बँकिंगसारखी संकल्पना यशस्वीपणे राबवली जात आहे.या उपक्रमाचे केंद्रप्रमुख दत्तात्रेय कोठेकर, शिक्षण विस्तार अधिकारी अरुणादेवी मोरे तसेच गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे यांनी विशेष कौतुक केले आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मायनी कोयना येथील ही डिजिटल पेपरलेस बँक शालेय शिक्षणात नव्या युगाची सुरुवात करणारी ठरत असून रायगड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात हा उपक्रम निश्चितच दिशादर्शक ठरणार आहे. विद्यार्थी पालक आणि शिक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाले असून शाळेच्या या अभिनव उपक्रमाबद्दल कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

> **"मायनी कोयना शाळेने राबवलेली डिजिटल पेपरलेस बँक ही काळाची गरज ओळखणारी आणि विद्यार्थ्यांना भविष्याच्या दिशेने नेणारी उपक्रमशील संकल्पना आहे. इतर शाळांसाठीही हा आदर्श ठरेल."**
> **- श्रीमती शर्मिला शेंडे गटशिक्षणाधिकारी पेण**

> **"विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना जीवनोपयोगी कौशल्ये देणे हा आमचा उद्देश आहे. डिजिटल बँकेमुळे मुलांमध्ये बचत, शिस्त आणि जबाबदारीची भावना निर्माण होत असून पालकांचाही या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळत आहे."**
> **- मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर**

# जिवंत हॅण्डग्रेनेडसह आरोपी अटकेत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

महिलेवर गोळीबार केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपीच्या दुचाकीच्या डिक्कीत जिवंत हॅण्डग्रेनेड सापडल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांनी दिवा परिसरातून आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्या दुचाकीची तपासणी केली असता सीटखाली ठेवलेले हॅण्डग्रेनेड आढळून आले. घटनेची गंभीरता लक्षात घेता बॉम्ब शोधक व नाशक पथकाला तातडीने पाचारण करण्यात आले आणि त्यांनी हॅण्डग्रेनेड सुरक्षितपणे निकामी केले. आरोपीकडे जिवंत हॅण्डग्रेनेड कसे आणि कुठून आले, तसेच त्यामागे मोठ्या घातपाताचा कट होता का, याचा पोलीस कसून तपास करत आहेत. या प्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपासातून आणखी महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मुरबाड पोलीसांच्या नियोजनामुळे म्हसा यात्रा शांततेत सुरू

**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**

**मुरबाड :** ऐतिहासिक म्हसोबाची यात्रा 3 जानेवारी पासून सुरू झाली असून यात्रा शांततेत व सुरळीत व निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी यावर्षी मुरबाड पोलिसांनी विशेष उपाययोजना केल्यामुळे यात्रा सुरु झाल्यापासून गडबड, गोंधळ किंवा गर्दी झालेली दिसून आली नाही.

ठाणे ग्रामिणचे पोलिस अधिक्षक डी. स्वामी यांच्या मार्गदशनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल लाड व मुरबाडचे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक दादासो एडके यांच्या कुशल नियोजनाखाली म्हसा यात्रा सुरळीत पार पडत आहे.

यावर्षी यात्रेत कधी नव्हे त्या नविन उपाय योजना पोलिसांनी केल्या आहेत.



यामध्ये मुरबाड रस्त्यावर कान्होळ पर्यंत रस्त्याला दोरीने दुभाजक लावले आहेत. संपुर्ण बाजार पेठेत, नाक्यावर भाविकांच्या सुरक्षिततेसाठी सततची सुचना व अनाउंन्समेंट, त्याच बरोबर बैलबाजार पर्यंत पोलीसांनी प्रथमच मनोरे उभारले असून पाकीटमार,खिसेकापू पासून भाविकांच्या सुरक्षेसाठी, देखरेखेसाठी प्रत्येक मनोर्यावर पोलीस तैनात केले आहेत.

यात्रेच्या बंदोबस्तासाठी तब्बल साडेपाचशे पोलीस कर्मचारी, अधिकारी तैनात असल्याचे पोलीस निरिक्षक दादासो एडके यांनी दिली असून पोलीस व होमगार्ड यांची फिरती पथके सुद्धा ठेवली आहेत. तीन दिवसात कोणतीही अनुचित घटना घडली नसून महिलांच्या पर्स व दागिने चोरावर तसेच छेडछाडीच्या घटनावर आम्ही विशेष लक्ष ठेवले असल्याची माहीती पत्रकारांना दिली. म्हसोबाच्या दर्शनासाठी अनिरुद्ध बापू यांच्या अनुयायींचे चांगले सहकार्य मिळत आहे.

यावर्षी म्हसा यात्रेत कोणतेही अवैध धंदे सुरू नसून जुगार, मटका, पाकोळी, गावठीदारू पुर्णपणे बंद ठेवण्यात आल्याने यात्रा शांततेत, सुरळीत व निविघ्नपणे पार पडत असल्याने आलेल्या भाविकांनी याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

# पोलीस रेझिंग डे निमित्त सायबर गुन्ह्यांविरोधात जनजागृती






**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण :** महाराष्ट्र पोलीस रेझिंग डे निमित्ताने शिवळे येथील जनसेवा शिक्षण मंडळाच्या शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात सायबर गुन्हेगारी जनजागृतीपर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव असलेले एक अभ्यासू व्यक्तिमत्व सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) संदिपान सोनवणे साहेब यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, वाहतूक सुरक्षा, व्यसनमुक्ती, महिला, बालक सुरक्षा आणि स्पर्धा परीक्षा बाबत सविस्तर व सखोल असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित विद्यार्थी व शिक्षक वृंद कर्मचारी यांना पोलीस दलाच्या गौरवशाली इतिहासाची माहिती देण्यात आली. सध्याच्या डिजिटल युगात तरुणाई सोशल मीडिया आणि ऑनलाइन व्यवहार मोठ्या प्रमाणात करत आहे. मात्र, याच काळात सायबर भामट्यांकडून होणारी फसवणूक हा चिंतेचा विषय ठरत आहे.त्यामुळ ओटीपी (OTP) शेअर करू नका, बँक खाते किंवा कोणत्याही खाजगी माहितीसाठी येणारा ओटीपी कोणालाही सांगू नका.अनोळखी लिंक्सवर क्लिक टाळा आणि आकर्षक ऑफर्स किंवा लॉटरीच्या आमिषाला बळी पडून कोणत्याही संशयास्पद लिंकवर क्लिक करू नका.तसेच सोशल मीडिया प्रायव्हसी फेसबुक, इंस्टाग्राम यांसारख्या प्लॅटफॉर्मवर आपली खाजगी माहिती आणि फोटो अनोळखी व्यक्तींना दिसणार नाहीत, याची काळजी घ्या.

सायबर हेल्पलाईन: सायबर फसवणूक झाल्यास त्वरित १९३० या क्रमांकावर किंवा www.cybercrime.gov.in या पोर्टलवर तक्रार नोंदवा. यावेळी एपीआय सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना सावध राहा, सुरक्षित राहा" असा मंत्र दिला. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर प्रगतीसाठी करावा, मात्र कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये, असे त्यांनी आवर्जून सांगितले. तसेच या रेझिंग डे उपक्रमात नशा मुक्ती स्वसंरक्षण वाहतूक नियमन सुरक्षा अमली पदार्थांचे दुष्परिणाम आदी अनेक मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन करून त्यामुळे होणारे दुष्परिणाम काय होतात हे सांगून विद्यार्थ्यांच्या मनावर आदर्शवत छाप पाडली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वृंद आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. पोलीस दलाने राबवलेल्या या उपक्रमात विद्यार्थी व शिक्षक वृंद व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांनी पोलीस उपनिरीक्षक संदिपान सोनवणे यांचे स्वागत करून असे उपक्रम वेगवेगळ्या शाळा महाविद्यालयांमध्ये राबवावेत असे पालकांनी मोठ्या अभिमानाने सांगितले.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# भविष्यवेध



मंगळवार
०६ जानेवारी २०२६

**मेष**
आज कामात उत्साह राहील. महत्त्वाची कामे मार्गी लागतील. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. आर्थिक स्थैर्य जाणवेल.

**वृषभ**
कुटुंबातील वातावरण आनंदी राहील. नवीन निर्णय फायदेशीर ठरतील. आरोग्याकडे लक्ष द्या. नवीन ओळखी उपयुक्त ठरतील. कामाच्या निमित्ताने प्रवास होऊ शकतो.

**मिथुन**
बोलण्यात संयम ठेवल्यास लाभ होईल. आर्थिक बाबतीत सुधारणा दिसून येईल. कामाचा ताण वाढण्याची शक्यता आहे. वेळेचे योग्य नियोजन करा.

**कर्क**
कामाची सुरुवात अनुकूल ठरेल. आत्मविश्वास वाढेल. कुटुंबाचे सहकार्य लाभेल. कामात अचूकतेने यश मिळेल. जबाबदाऱ्या वाढतील.

**सिंह**
वादविवाद टाळावेत व आरोग्याची काळजी घ्यावी. रखडलेली कामे पूर्ण होतील. मित्रांचे सहकार्य मिळेल. आर्थिक लाभाचे संकेत आहेत. निर्णय घाईत घेऊ नका.

**कन्या**
अनावश्यक खर्च टाळा. मानसिक शांतता राखण्याचा प्रयत्न करा. नोकरी व व्यवसायात प्रगती होईल. प्रवास यशस्वी ठरेल. नवीन संधी प्राप्त होतील.

**तुळ**
संयम व मेहनतीने यश मिळेल. कामात स्थिरता राहील. वरिष्ठांशी संवाद साधताना सावधगिरी ठेवा. नवीन कल्पना प्रत्यक्षात आणण्याची संधी मिळेल.

**वृश्चिक**
समाजात मान-सन्मान वाढेल. दिवस सकारात्मक जाईल. कुटुंबाचे सहकार्य लाभेल. भावनिक निर्णय टाळा. कामात समाधान मिळेल.

**धनु**
सहकारी एका विशेष धार्मिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात व्यस्त असतील. आज तुम्हाला वैयक्तिकरित्या व्यक्तिमत्त्वात काही बदल करण्याची आवश्यकता आहे.

**मकर**
विद्यार्थ्यांना त्यांच्या वरिष्ठांच्या मदतीने शैक्षणिक स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळेल. यश हमखास मिळेल. प्रशासकीय विभागाकडून नोकरीची ऑफर मिळू शकते.

**कुंभ**
काही नवीन मित्र बनवाल. तुम्ही दैनंदिन घरगुती वस्तू खरेदी करण्यासाठी जास्त पैसे खर्च कराल. राजकारणात आवड वाढेल आणि तुम्ही सक्रिय भूमिका बजावा.

**मीन**
इतरांकडून प्रशंसा मिळवाल. आज कामाच्या अतिरेकामुळे थकवा येऊ शकतो. स्पर्धात्मक विद्यार्थ्यांना आज बहुप्रतिक्षित निकाल मिळाल्याने आनंद होईल.

# ठाणे महापालिकेच्या रणांगणात महायुतीच्या शिंदे गटाचाच वरचष्मा

**ठाणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी चिन्हवाटप पूर्ण होताच राजकीय चित्र स्पष्ट झाले असून, निवडणुकीचा रणसंग्राम सुरू झाला आहे, महायुती अस्तित्वात असली तरी प्रत्यक्ष मैदानात शिवसेना शिंदे गटाचाच वरचष्मा असल्याचे प्रभागनिहाय पॅनेल रचनेतून स्पष्ट झाले आहे. महायुतीतील सत्ता-संतुलन पूर्णपणे शिवसेना शिंदे गटाकडे झुकल्याचे तुर्तास दिसून येत आहे.**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**(ठाणे/प्रतिनिधी)**

चिन्हवाटपानंतर जाहीर झालेल्या प्रभागनिहाय पॅनेल रचनेतून महायुतीतील राजकीय वजन पूर्णपणे शिवसेना शिंदे गटाकडे झुकले असल्याचे चित्र समोर आले आहे. ठाणे महापालिकेच्या एकूण ३३ प्रभागांमध्ये 'अ, ब, क, ड' अशा चार जागांचे पॅनेल असताना, शिंदे गटाने थेट १२ प्रभागांत चारही जागा काबीज करत आपले उमेदवार रिंगणात उतरवले आहेत. याच्या तुलनेत भाजपला केवळ तीनच पूर्ण पॅनेल मिळाल्याने महायुतीतील त्यांची भूमिका दुय्यम ठरल्याचे दिसून येत आहे. उर्वरित प्रभागांत 'मैत्रीपूर्ण समन्वय' दाखवण्यापुरतीच भूमिका भाजपच्या वाट्याला आली असून, रणसंग्रामात उतरलेल्या उमेदवारांच्या यादीवरून हे स्पष्ट होत आहे. २०१७ साली झालेल्या ठाणे महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीतही चार प्रभागांचा एक पॅनेल अशा पद्धतीने एकूण ३३ पॅनेल होते. त्या निवडणुकीत १३१ जागांसाठी तब्बल १ हजार १३४ उमेदवार रिंगणात उतरले होते. त्यावेळी शिवसेनेने सर्वाधिक ६७ जागांवर विजय मिळवून पालिकेवर वर्चस्व प्रस्थापित केले होते. ३४ नगरसेवकांसह राष्ट्रवादी काँग्रेस दुसऱ्या क्रमांकावर होती, तर भाजपचे २३ नगरसेवक निवडून आले होते. त्यावेळी शिवसेनेने तब्बल १२ पॅनेलवर एकहाती वर्चस्व मिळवले होते, तर भाजपला तीन पॅनेलवर समाधान मानावे लागले होते. हाच राजकीय गणिताचा फॉर्म्युला यंदाही लागू करण्यात आल्याचे पॅनेल वाटपावरून स्पष्ट होत असून, ठाणे पालिकेच्या रणसंग्रामात शिंदे गटाने आघाडी घेतल्याचे चित्र सध्या तरी दिसत आहे.

चिन्हवाटपानंतरच्या प्रभागनिहाय पॅनेल रचनेतून ठाणे महापालिकेत महायुतीतील राजकीय वजन शिवसेना शिंदे गटाकडे झुकल्याचे स्पष्ट झाले आहे. एकूण ३३ प्रभागांपैकी शिंदे गटाने १२ प्रभागांत चारही जागांचे पूर्ण पॅनेल उभे केले असून, भाजपला केवळ तीन पूर्ण पॅनेल मिळाले आहेत. उर्वरित प्रभागांत भाजपची भूमिका मर्यादित असल्याचे उमेदवार यादीवरून दिसते. २०१७ च्या निवडणुकीतीलच सूत्र यंदाही लागू करण्यात आल्याचे चित्र असून, ठाणे पालिकेच्या रणसंग्रामात शिंदे गट आघाडीवर असल्याचे संकेत मिळत आहेत.

# वसई विरारमध्ये शरद पवार गटाचा बविआला पाठिंबा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वसई :** वसई विरार महापालिका निवडणूकीत राष्ट्रवादी शरद पवार यांच्या पक्षाने एकही उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरविलेला नाही. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने बहुजन विकास आघाडीच्या उमेदवारांना जाहीर पाठींबा घोषित केला आहे. वसई विरार महापालिकेची ११५ जागांसाठी १५ जानेवारीला निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. यासाठी शहरातील सर्वच राजकीय पक्ष सक्रिय झाले आहेत. अन्य सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी युती आघाडी करीत आपले उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरविले आहेत. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या पक्षाने एकही उमेदवार या निवडणुकीत उतरविला नाही. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस नेमक्या कोणत्या पक्षाला सहकार्य करते याकडे लक्ष लागले होते. पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या धोरणांना रोखण्यासाठी काँग्रेस पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, सीपीएम, कष्टकरी संघटना, आदिवासी एकता परिषद, बहुजन विकास आघाडी व राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) यांच्यात व्यापक लोकशाही आघाडी स्थापन करण्यात आली आहे. पदाधिकारी यांच्याशी पार पडलेल्या बैठकीत आघाडी बाबत शिकामोर्तब करण्यात आला. तसेच पालघर जिल्ह्यातसुद्धा ही आघाडी कायम ठेवणार असल्याचे बहुजन विकास आघाडीच्या नेत्यांनी स्पष्ट केले आहे.

# काँग्रेस की एमआयएम?

## मिरा-भाईंदरमध्ये युतीवरून राजकीय रणकंदन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भाईंदर :** भाईंदरमध्ये शनिवारी (ता. ३) भाजपचे आमदार नरेंद्र मेहता यांनी मिरा-भाईंदर महापालिकेसाठी काँग्रेस व शिवसेनेमध्ये युती झाल्याचा आरोप केला होता. त्यानंतर रविवारी (ता. ४) परिवहनमंत्री आणि शिवसेना नेते प्रताप सरनाईक यांनी जोरदार प्रत्युत्तर देत भाजपने एमआयएमशी युती केली असल्याचा आरोप केला. तसेच भाजपकडून एमआयएमच्या उमेदवारांना आर्थिक रसद पुरवली जात असल्याचा दावाही त्यांनी केला.

मिरा-भाईंदरमध्ये सध्या निवडणुकीचे वातावरण तापू लागले असून, मुंबई आणि ठाण्यात भाजप-शिवसेनेत युती असताना मिरा-भाईंदरमध्ये मात्र ही युती होऊ शकलेली नाही. त्यामुळे आमदार नरेंद्र मेहता आणि परिवहनमंत्री प्रताप सरनाईक हे दोघेही थेट एकमेकांसमोर उभे ठाकले असून, आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत.

दोन्ही नेते महापालिकेत स्वबळावर सत्ता स्थापन करण्याचा दावा करीत असून, त्यामुळे भाजप-शिवसेना संघर्ष टोकाला पोहोचल्याचे चित्र आहे. शिवसेनेने काँग्रेसच्या काही उमेदवारांविरोधात आपले उमेदवार उभे न केल्याचा आरोप मेहता यांनी केला होता. तसेच उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी काँग्रेसने काही ठिकाणी आपले अधिकृत उमेदवार अचानक मागे घेतल्याने त्या ठिकाणी शिवसेनेला मदत होत असल्याचा आरोपही त्यांनी केला होता.

### भाजप आमदार नरेंद्र मेहतांचा आरोप

**■ मिरा-भाईंदर महापालिकेत शिवसेना–काँग्रेस युती झाली असून, काही प्रभागांत शिवसेनेने उमेदवार उभे न करता काँग्रेसला अप्रत्यक्ष मदत केल्याचा दावा भाजप आमदार नरेंद्र मेहता यांनी केला.**

### परिवहन मंत्री सरनाईकांचे प्रत्युत्तर

**■ भाजपने थेट एमआयएमशी युती केल्याचा आरोप परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी केला असून, एमआयएमच्या उमेदवारांना भाजपकडून आर्थिक रसद पुरवली जात असल्याचाही दावा त्यांनी केला.**

दरम्यान, या आरोप-प्रत्यारोपांमुळे मिरा-भाईंदर महापालिका निवडणुकीतील राजकीय समीकरणे अधिक गुंतागुंतीची होत चालली असून, पुढील काळात हा संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



# भिवंडीत सपाचा गड हादरला!

## नव्या सत्तासमीकरणाचा उदय

### सपा बाजूला काँग्रेस-भाजप-शिवसेनेचा दबदबा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** निवडणुकीपूर्वी भिवंडी (पूर्व) विधानसभा मतदारसंघात समाजवादी पक्षाचे वर्चस्व होते. मात्र सध्याच्या राजकीय घडामोडींमध्ये काँग्रेस, भाजप आणि शिवसेनेने (शिंदे गट) या मतदारसंघात आपले वर्चस्व प्रस्थापित केल्याचे चित्र दिसून येत आहे. सपा आमदार रईस शेख यांच्या भूमिकांमुळे समाजवादी पक्षाला बाजूला सारले गेल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

असे असतानाही आमदार रईस शेख आपण अद्याप समाजवादी पक्षासोबत असल्याचा दावा करत असून, विरोधकांच्या आरोपांकडे दुर्लक्ष करून सपा सदस्य असल्याचे दाखवणारे व्हायरल व्हिडिओ प्रसिद्ध करत आहेत. मात्र प्रत्यक्ष निवडणूक गणितात, महानगरपालिका निवडणुकीत मुस्लिम बहुल भागांमध्ये काँग्रेसच्या उमेदवारांना रईस शेख यांचा पाठिंबा मिळाल्याने काँग्रेसला फायदा होत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी सपा उमेदवार मागे पडले असून, इतर पक्षही या भागात पिछाडीवर असल्याचे चित्र आहे.

दुसरीकडे, हिंदू बहुल प्रभागांमध्ये भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) वरचढ ठरत आहेत. या भागांत भाजप-शिवसेनेच्या उमेदवारांनी सर्व ताकद पणाला लावून प्रचार केल्याचे दिसून येत असून, नियमभंग, दबाव आणि आर्थिक प्रलोभनांचे आरोपही राजकीय चर्चेत रंगू लागले आहेत. भाजपचे सहा उमेदवार नियम व कायद्यांचे उल्लंघन करून बिनविरोध निवडून आल्याची चर्चा असून, महायुतीचे एकुण सहा उमेदवार बिनविरोध विजयी झाल्याचा मुद्दा चांगलाच तापला आहे.

भिवंडी (पश्चिम) विधानसभा मतदारसंघात भाजप-शिवसेना (शिंदे गट) यांची थेट लढत माजी महापौर विलास आर. पाटील, जावेद दळवी आणि काँग्रेसशी होत आहे. दोनदा भिवंडीचे प्रथम नागरिक म्हणून सन्मानित झालेले माजी महापौर विलास आर. पाटील यांनी स्थापन केलेली कोणार्क विकास आघाडी आणि जावेद दळवी यांच्या नेतृत्वाखालील भिवंडी विकास आघाडी या दोन्ही आघाड्या आपल्या कुटुंबीयांसह निवडणूक रिंगणात उतरल्या असून, आमदार महेश बाघुले यांच्या नेतृत्वाखालील भाजपला थेट आव्हान देत आहेत. भिवंडी मतदारसंघात हिंदू-मुस्लिम दोन्ही समुदायांतील उमेदवार सर्वच पक्षांकडून उभे करण्यात आले असून, जिंकण्यासाठी सर्व मार्गांचा अवलंब केला जात आहे. मात्र इतक्या तीव्र राजकीय संघर्षानंतरही भिवंडी शहराचा सर्वांगीण विकास अद्याप दूरच असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# बंडोबा झाले थंडोबा !

## बंडखोरी आटोक्यात; तरीही धोका कायम !

### ठाकरे गटात सर्वाधिक आठ तर भाजपमध्ये पाच बंडखोर मुंबईत 'फ्रेंडली फाईट'मुळे मतविभाजनाची शक्यता



**इतर महापालिकांच्या तुलनेत मुंबई महापालिका निवडणुकीत बंडखोरीचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी, काही प्रभागांत बंडखोर अद्याप रिंगणात असल्याने युती आणि आघाड्यांसमोर मतविभाजनाचे संकट कायम आहे. निकालाच्या दिवशी कोणाच्या तोंडचे पाणी पळेल आणि कोणाचा बालेकिल्ला ढासळेल, हे या 'आतील लढती' ठरवणार आहेत.**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई:** मुंबईत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी अनेक बंडखोरांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेत बंडाची तलवार म्यान केली. मात्र तरीही काही प्रभागांत बंडखोर उमेदवार निवडणूक रिंगणात कायम राहिले आहेत. सर्वाधिक आठ बंडखोर ठाकरे गटात असून, त्याखालोखाल भाजपमध्ये पाच जणांनी बंडखोरी केली आहे.

या निवडणुकीत पालिकेच्या उमेदवारीतून वंचित राहिलेल्या अनेक इच्छुक कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी थेट पक्षाला आव्हान देत अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. स्वतंत्र निवडणूक चिन्हांसह हे बंडखोर मैदानात उतरले असून, त्यांच्या उपस्थितीमुळे काही प्रभागांत लढती तिरंगी तर काही ठिकाणी चौरंगी होण्याची शक्यता आहे. यावेळी शिवसेनेने मनसेसोबत युती केल्याने शिवसेनेत सर्वाधिक बंडखोरी झाल्याचे चित्र आहे. यातील काही बंडखोरांनी थेट 'धनुष्यबाण' हे चिन्ह हाती घेतल्याने पक्षातील अंतर्गत नाराजी उघडपणे समोर आली आहे. भाजपनेही यावेळी शिवसेनेसोबत युती करत सुमारे ९० जागा सोडल्याने अनेक इच्छुकांनी बंडखोरीचा मार्ग स्वीकारला. भाजप नेतृत्वाने प्रयत्नपूर्वक अनेक बंडखोरांना शांत केले असले तरी, पाच ठिकाणी पक्षाच्या बंडखोरांनी थेट युतीलाच आव्हान दिले आहे. विशेष म्हणजे, यातील अनेक बंडखोर हे प्रभावी उमेदवार असून, त्यांच्या जनमानसातील पकडीमुळे लढतींचे गणित बदलत आहे.

अनेक प्रभागांत बंडखोर उमेदवार प्रभावी ठरत असून, त्यांची स्थानिक पातळीवरील पकड लक्षात घेता काही बंडखोर निवडून येण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. विजयाचे गणित काही हजार मतांवर अवलंबून राहण्याची शक्यता असल्याने, हे बंडखोर निकालात निर्णायक ठरणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. दरम्यान अर्ज मागे घेतल्याने बंडखोरीचे वादळ काहीसे शमले असले, तरी मैदानात टिकून असलेले बंडखोर हे केवळ संख्येने नाही तर प्रभावाने महत्त्वाचे ठरत आहेत. पारंपरिक मतदारसंघांमध्ये काही हजार मतांचे गणित निर्णायक ठरणार असताना, हे बंडखोर उमेदवार थेट विजय-पराभवाची दिशा बदलू शकतात.

# कल्याण-डोंबिवलीत महिलांची ताकद

## महिलांच्या 61 जागांसाठी 224 उमेदवार रिंगणात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणूकीसाठी महिलांसाठी आरक्षित असलेल्या 61 जागांसाठी विविध राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारी लढण्यासाठी 224 उमेदवारी अर्ज दाखल करीत निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत.

महापालिकेच्या 122 जागांकरीता 31 पॅनलमधून निवडणूक होणार आहे. निवडणूकी आधीच 20 जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले आहे. त्यामध्ये भाजपच्या 14 आणि शिंदे सेनेच्या सहा उमेदवारांचा समावेश आहे. 20 बिनविरोध उमेदवारांमध्ये 12 जागांवर महिला उमेदवार निवडून आल्या आहेत. त्यांनी निवडणूकीच्या आधीच बिनविरोध निवडून येण्याची बाजी मारली आहे. त्यामुळे आत्ता प्रत्यक्षात मतदान प्रक्रिया घेऊन 102 प्रभागात निवडणूक घेतली जाणार आहे. महापालिकेच्या एकूण जागांपैकी अनुसूचित जातीच्या महिला उमेदवारांकरीता 6, अनुसूचित जमातीच्या महिला उमेदवारांकरीता 2 जागा आणि नागरीकांच्या मागास प्रवर्गाकरीता महिलांसाठी 16 जागा आरक्षित होत्या. याशिवाय खुल्या प्रवर्गाकरीता 37 जागा महिलांसाठी आरक्षीत होत्या. महापालिकेच्या निवडणूकीत भाजपकडून 22 महिला उमेदवार निवडणूक लढवित आहेत. तर शिंदेसेनेकडून 34 महिला निवडणूकीच्या रिंगणात आहेत. उद्धव सेनेकडून 36 महिलांना उमेदवारी दिली गेली आहे. 36 महिला निवडणूक लढवित आहेत. मनसेकडून 16 महिला निवडणूकीत नशीब आजमावित आहेत. काँग्रेस पक्षाकडून 23 महिलांना उमेदवारी दिली गेली आहे. या निवडणूकीत भाजप आणि शिंदे सेनेची महायुती असल्याने एकूण 56 महिलांना उमेदवारी दिली आहे. तर मनसे आणि उद्धव सेनेची युती असल्याने त्यांनी एकूण 52 महिलांना निवडणूकीची संधी दिली आहे. काँग्रेस पक्षाने 23 महिलांना उमेदवारी दिली. भाजप, शिंदे सेना, उद्धव सेना, मनसे आणि काँग्रेस पक्ष मिळून 131 महिलांना उमेदवारी दिली आहे. उर्वरीत 93 जागांवर राष्ट्रवादी शरद पवार, राष्ट्रवादी अजित पवार, वंचित बहुजन आघाडी आरक्षित प्रभागानुसार महिला उमेदवारांना संधी दिली आहे






# नवी मुंबईत आघाडीत बिघाडी ?

## ■ ठाकरे–मनसे एकत्र ■ शरद पवार गट नाराज





**ठाणे–नवी मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसे एकत्र आल्याने महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याचे संकेत आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाला जागावाटपात विश्वासात न घेतल्याचा आरोप करत जिल्हाध्यक्ष डॉ. मंगेश आमले यांनी नाराजी व्यक्त केली असून, आमच्याकडून कोणतीही फूट नाही, असा दावा केला आहे.**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत (MVA) बिघाडी झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसे एकत्र आल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट बाजूला पडल्याचे चित्र असून, यावर राष्ट्रवादी शरद पवार गटाने उघड नाराजी व्यक्त केली आहे. नवी मुंबईतील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष डॉ. मंगेश आमले यांनी शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसेवर गंभीर आरोप करत सांगितले की, "आमच्याकडून कोणत्याही प्रकारची बिघाडी झालेली नाही. ठाकरे गट आणि मनसे यांनी एकत्र लढण्याची घोषणा केली, याची माहिती आम्हाला नंतर मिळाली. जागावाटपातही आम्हाला विश्वासात घेतले गेले नाही," असा आरोप त्यांनी केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ठाकरे बंधू एकत्र आल्याने राजकीय समीकरणांना वेगळेच वळण मिळाले असले, तरी या युतीमुळे महाविकास आघाडीत अस्वस्थता निर्माण झाली आहे. "ही बाब स्थानिक कार्यकर्त्यांना रुचलेली नाही," असे आमले यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, "नैसर्गिक महाविकास आघाडी ही राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), शिवसेना (ठाकरे गट) आणि काँग्रेस यांची आहे. स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांमध्ये समन्वय आहे आणि प्रचार यंत्रणाही संयुक्तपणे काम करत आहे. आमच्याकडून कोणत्याही प्रकारची फूट पाडण्याची भूमिका घेतलेली नाही," असा पुनरुच्चार त्यांनी केला.

ठाकरे–मनसे युतीमुळे निर्माण झालेली ही राजकीय धुसफूस महाविकास आघाडीच्या एकजुटीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत असून, याचे पडसाद येत्या महापालिका निवडणुकीत उमटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# जिल्हा परिषद शाळा दिवेचा विद्यार्थी नासा ऑलम्पियाडच्या दुसऱ्या टप्प्यात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** जिल्हा परिषद शाळा दिवे या शाळेतील विद्यार्थी तनिष संदीप पाटील याने नासा ऑलम्पीयाड परीक्षेत दुसऱ्या पातळीसाठी पात्र होऊन एक अत्यंत गौरवशाली यश संपादन केले आहे. हे यश तनिषच्या अथक परिश्रम, जिद्द, चिकाटी व वैज्ञानिक दृष्टिकोनाचे फलित आहेच; परंतु त्यामागे त्याला सातत्याने प्रेरणा व मार्गदर्शन देणारे देवेश पाटील, आकाश म्हात्रे तसेच शाळेतील मार्गदर्शक पांडुरंग भोईर या शिक्षकांचे योग्य दिशादर्शन यांचा मोलाचा वाटा आहे.विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांना योग्य संधी देणे, स्पर्धात्मक परीक्षांसाठी आत्मविश्वास निर्माण करणे आणि भविष्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे हेच या यशामागील खरे बळ आहे. तनिषला पुढील टप्प्यासाठी शुभेच्छा देण्यात आले असून देवेश पाटील, आकाश म्हात्रे व सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले.



# निवडणूक उमेदवारांसाठी दैनंदिन जमा व खर्च नोंदी प्रशिक्षण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात सार्वत्रिक निवडणूक 2025-26 सुरळीत व यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी व खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी उमेदवारांचे खर्च लेखांकन करणेसाठी अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

निवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे, मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूच्या वाटपावर अंकुश ठेवणे. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार विविध पथकांची (VVT, VST, FST इ.) नेमणूक करण्यांत आलेली आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात या सार्वत्रिक निवडणूकीसाठी निवडणूक कालावधीत उमेदवारांचे खर्च लेखांकन करण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी/ कर्मचारी, VVT, VST, FST प्रमुख, तसेच निवडणूकीतील उमेदवार/उमेदवारांचे प्रतिनिधी यांचेकरीता उमेदवारांचे दैनंदिन जमा व खर्चाच्या नोंदीबाबत व्दितीय प्रशिक्षण प्र.के.अत्रे रंगमंदिर, कल्याण (पश्चिम) येथे दि.06/01/2026 रोजी सकाळी 11.30 वाजता आयोजित करण्यात आले आहे.

सर्व खर्च लेखांकन अधिकारी/कर्मचारी ,समन्वय अधिकारी, VVT, VST, FST पथक प्रमुख तसेच निवडणूकीतील उमेदवार/उमेदवाराचे प्रतिनिधी व सर्व संबंधित यांनी उमेदवारांचे दैनंदिन जमा व खर्चाचे नोंदीबाबतच्या या व्दितीय प्रशिक्षणासाठी उपस्थित रहावे.

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**
**सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६**
**दि. ०६/०१/२०२६ (मंगळवार)**
**सकाळी ११.३० वाजता**
**प्र.के. अत्रे रंगमंदिर, कल्याण (पश्चिम)**
**उमेदवार, प्रतिनिधी, खर्च लेखांकन अधिकारी, VVT, VST, FST पथक प्रमुख.**

# ठामपा हद्दीतील दिव्यांगांचे स्टॉल अवैध फेरीवाल्यांच्या विळख्यात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** ठाणे महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना उपलब्ध करून देण्यात आलेले स्टॉल सध्या अवैध फेरीवाल्यांच्या विळख्यात सापडले असून यामुळे दिव्यांग व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप दिव्यांग संघटनांनी केला आहे.

काही महिन्यापूर्वी ठाणे शहरातील दिव्यांग व्यक्तींना मिळणारे अनुदान, दिव्यांग भवन तसेच विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत दिव्यांग स्टॉलच्या शेजारी इतर फेरीवाले आपले स्टॉल, हातगाड्या लावून व्यवसाय करत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. दिव्यांग स्टॉलच्या बाजूला इतर फेरीवाल्यांनी किमान ३० फूट अंतर ठेवून व्यवसाय करावा व दिव्यांग स्टॉलच्या लगत धंदा करू नये, अशी ठाम मागणी सर्व दिव्यांग संघटनांनी दिव्यांग समिती अध्यक्ष व अतिरिक्त आयुक्त (२) यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत अतिरिक्त आयुक्तांनी सर्व प्रभाग समितींना तशा प्रकारचे आदेश दिले असल्याचे सांगण्यात आले. मात्र ठाणे महानगरपालिका हद्दितील दिव्यांगांचे स्टॉल बाजुला असलेले अवैध फेरीवाले हटविण्याची ठोस कार्यवाही अद्याप झाल्याचे दिसून येत नसल्याने दिव्यांग समिती सदस्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. आयुक्तांचे स्पष्ट आदेश असतानाही त्यांची अंमलबजावणी न करणाऱ्या संबंधित सहाय्यक आयुक्त व अतिक्रमण विभाग यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी दिव्यांग समिती सदस्य व संघटनांनी केली आहे.

# जीवनदीप महाविद्यालयात सावित्रीबाई फुले व जिजाऊंना मानवंदना

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**




**गोवेली :** स्त्री शिक्षणासाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या सावित्रीबाई फुले तसेच स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधत; जीवनदीप महाविद्यालय गोवेली कनिष्ठ ,वरिष्ठ व विधी महाविद्यालय तसेच महिला विकास मंच व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक ०३- ०१- २०२६ रोजी या महान स्त्रियांना त्यांचे कार्य आपल्या मनोगत द्वारे व्यक्त करीत मानवंदना देण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, यांनी या महान स्त्रियांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत दीप प्रज्वलित केले. महाविद्यालयात मुलींनी सावित्री, जिजामाता, आनंदीबाई जोशी अशा कीर्तीवंत स्त्रियांचे पेहेराव करीत आपले मनोगत व्यक्त केले. बालिका दिनाचे औचित्य साधत रांगोळी स्पर्धा व वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे, संचालक. प्रशांत घोडविंदे यांचे मोलाचे सहकार्य या कार्यक्रमाला लाभले. IQAC विभाग प्रमुख. प्रा. प्रियंका पाटील, महिला विकास मंच प्रमुख. प्रा. मीना मुळीक, इतिहास विभागप्रमुख. प्रा. कविता काटकर यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन TYBA ची विद्यार्थिनी प्रांजल कोर हिने केले . सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांच्या एकत्रित सहभागाने हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# बालक मंदिर संस्थेच्या वतीने वक्तृत्व स्पर्धेचे यशस्वी आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**




**कल्याण :** बालक मंदिर संस्था, कल्याण यांच्या वतीने कै. इंदूताई देवधर व कै. वा. शि. आपटे स्मृती प्रित्यर्थ वक्तृत्व स्पर्धा रविवार, ४ जानेवारी २०२६ रोजी संस्थेच्या हॉलमध्ये सकाळी ९ वाजता उत्साहपूर्ण वातावरणात सुरू झाली. या वर्षी या स्पर्धेचे २१ वे वर्ष होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालक मंदिर संस्थेचे विश्वस्त श्री. व. द. काणे सर हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. संभाजी राजाराम शेळके (प्राध्यापक, व्याख्याता व इतिहास अभ्यासक) यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच यावेळी संस्थेच्या सौ.तृप्ती माळीचकर या देखील उपस्थित होत्या.

संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. मयुरेश गद्रे सर यांनी कार्यक्रमासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच संस्थेच्या विश्वस्त व स्पर्धा प्रमुख सौ. तेजस्विनी पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे यशस्वी नियोजन करण्यात आले.

समिती प्रमुख शिंदे सर (ओक हायस्कूल) व सौ. तृप्ती राहुल गायकवाड (बालक मंदिर संस्था, इंग्रजी प्राथमिक शाळा) यांच्या नेतृत्वाखाली तसेच समितीतील सर्व शिक्षकांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या वक्तृत्व स्पर्धेत विविध शाळांमधून आलेल्या एकूण २२० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी सामाजिक, शैक्षणिक व समकालीन विषयांवर प्रभावीपणे आपले विचार मांडले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे विशेष कौतुक केले.

याच उपक्रमांतर्गत कै. क. ह. देशपांडे स्मृती प्रित्यर्थ ठाणे जिल्ह्यातील शिक्षकांसाठी निबंध स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांनी या स्पर्धेत मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत विचारप्रवर्तक लेखन सादर केले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री.विलास लिखार, श्री. जितेंद्र निकुंभ, श्री. शशिकांत गवारे, श्री. प्रकाश पानसरे व इतर सहकारी यांची मोलाची मदत झाली.या कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे सुत्रसंचलन व आभाराचे काम कॅप्टन ओक हायस्कूलच्या सौ.मनीषा जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजक समिती, शिक्षकवृंद व सहभागी विद्यार्थी यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

## स्व. वसंतराव डावखरे स्मृतिदिनानिमित्त
# जलतरण स्पर्धेचे उद्घाटन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** विधान परिषदेचे माजी उपसभापती स्व. वसंतराव डावखरे साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त सालाबादप्रमाणे ठाण्यातील मारोतराव शिंदे जलतरण तलाव येथे आयोजित जलतरण स्पर्धेचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. ही स्पर्धा समन्वय प्रतिष्ठान आणि ठाणे जिल्हा जलतरण संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धेच्या माध्यमातून क्रीडा, शिस्त आणि आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. विविध वयोगटांतील खेळाडूंनी जलतरण कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करत स्पर्धेला रंगत आणली. तरुण खेळाडूंना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

उद्घाटन सोहळयास ठाणे शहर आमदार श्री. संजय केळकर, ॲड. मकरंद अभ्यंकर, जलतरण तलाव उपव्यवस्थापक श्री. रवी काळे, प्रशिक्षक श्री. कैलास आखाडे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या मनोगतात स्व. वसंतराव डावखरे साहेबांचे सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडाविषयक योगदान अधोरेखित करत, त्यांच्या स्मृती जपणारे असे उपक्रम समाजासाठी मार्गदर्शक असल्याचे मत व्यक्त केले.

## सफाळे पूर्वमध्ये
# ट्रॅफिक पोलिसांची जनजागृती मोहीम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**




**सफाळे :** ३७ व्या रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत मा.श्री. यतिन देशमुख पालघर जि. पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री. सुरेश साळुंखे - वाहतूक शाखा प्रभारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सफाळे पुर्व ता.जि.पालघर रेल्वे रिक्षा स्टँडवर असलेल्या रिक्षा चालक, वाहक आणि मोटरसायकल धारकांना पालघर जिल्हा वाहतूक शाखेचे सफाळे येथे कार्यरत बाळासाहेब यमगार आणि पोलिस अंमलदार खेतले यांनी तिनं चाकी वाहन चालक, मोटरसायकल धारकांना, वाहतूक नियमांचे पालन करणे आणि स्वतःच्या व इतरांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आणि रस्ते अपघात कमी करणे हे सुरक्षा सप्ताहचा मुख्य उद्देश आहे,

यासाठी दोन चाकी वाहन चालकाची हेल्मेट आणि चार चाकी वाहन चालकांनी वाहन सीट बेल्टचा वापर करणे अनिवार्य आहे. हे अपघात झाल्यास गंभीर इजा टाळण्यास मदत करते. वेगमर्यादेचे पालन करित वेगावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

कोणतेही वाहन दारू पिऊन चालवणे टाळा, कारण यामुळे अपघात होऊ शकतात. वाहतूक सिग्नल, लेन कटिंग आणि इतर सर्व वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

वाहन चालवताना विचार करून सावधपणे गाडी चालवा. वाहन चालवतांना मोबाइलचा वापर, फोनवर बोलणे किंवा मेसेज करणे टाळा. नियमित पणे गाडीचे वाहनाचे टायर, ब्रेक आणि लाईट्स व्यवस्थित आहेत का, हे तपासा. आपल्या गाडीत रिक्षेत बसणारे हे आपल्यावर विश्वास/भरोसा ठेऊन आपल्या गाडीत प्रवास करीत आहेत. प्रवासी आणि आपली काळजी घेणे गरजेचे आहे, आपल्या प्रमाणे त्यांचीही कोणी वाट पाहत असतात. हे लक्षात घेऊन वाहन चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

या सर्व गोष्टींचे पालन करून, प्रत्येक वाहन चालक हे "सुरक्षा सप्ताह' यशस्वी करण्यात मदत करू शकतात . असेही मार्गदर्शन करताना यमगार आणि खेतले अंमलदार यांनी जमलेल्या गाडी चालकांना मार्गदर्शन करताना सांगितले.

# निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल
## निवडणूक अधिकारी




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी निवडणूक प्रक्रिया शिस्तबद्ध सुरू असून येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. त्यानुषंगाने निवडणूक कर्तव्यावर नियुक्त कर्मचाऱ्यांसाठी ६ व ७ जानेवारी २०२६ रोजी द्वितीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या प्रशिक्षणाला सर्व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे निर्देश मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी अनमोल सागर यांनी दिले असून गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करून त्याची नोंद सेवा पुस्तकात करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# पेण शहर समस्यांच्या गर्तेत
## नवीन नगरसेवकांना विकास काम करावयाची संधी - सी.आर.म्हात्रे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** नुकताच पेण नगर परिषदेची निवडणूक पार पडली. त्या निवडणुकीत गटातटाचे राजकारण उदयास आले, पेण तालुक्याच्या निवडणुकीनंतर विजयी उमेदवारांचे प्रत्येक बॅनरवर गटागटाचे नगरसेवक यांचे फोटो झळकू लागले, त्यामुळे पेण तालुक्याचा विकास नक्की कोणता गट करेल यावर पुढचे नागरिकांचे भविष्य अवलंबून आहे अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी दिली.

मागील दहा वर्षापेक्षा या पंचवार्षिक काळ सत्ताधाऱ्यांसाठी धोक्याची घंटा बनू शकते. अशी चर्चा पेणमध्ये प्रत्येक नागरिकांमध्ये रंगताना दिसत आहे. नगरपालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी आता थांबली असून विकास कामाकडे लक्ष देणे क्रमप्राप्त असताना, पेण नगरपालिकेत मात्र या गोष्टीचा अभाव दिसत आहे अशी खंत ही व्यक्त केली.रस्त्याची अवस्था कठीण आहे. होणारी प्रचंड वाहतुकीची कोंडी, वाढलेले गाड्यांचे प्रमाण रस्त्यावर लागलेली दुकान, हातगाड्या यामुळे शहरात फिरायला सुद्धा जागा उरत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. याला नक्कीच जबाबदार कोण? प्रशासन की सामान्य नागरिक हा प्रश्न पडला आहे असेही सांगितले.

पेण मधल्या तलावावर सुशोभिकरण होणे गरजेचे आहे. पिण्याच्या पाण्याचा उद्भव आहे. त्या ठिकाणची स्वच्छता ही बाब सुद्धा महत्त्वाची आहे.शहरात अशुद्ध पाण्याचा पुरवठा ही पण एक मोठी समस्या आहे. रामवाडी सारख्या ठिकाणी अरुंद रस्ते, समर्थ नगर, चिंचपाडा झिराळ आळी, नंदीमाळ नाका, पेणचा मुख्य रस्ता या ठिकाणचे रस्ते कधी कात टाकणार याकडे सुद्धा संपूर्ण जनता आशेने पाहत आहे. पेण शहरात जाताना बायपास चिंचपाडाकडे जाणारा रस्ता आणखी किती वर्ष नगरपालिका बनवणार याची उत्सुकता सुद्धा सामान्य नागरिकाला आहे. नक्की पेणच्या विकासाला खिळ बसते का असा प्रश्न नागरिकांच्या मनात आहे. बॅरिस्टर ए. टी. पाटील चौक विकास कामाचे काय झाले? छत्रपती संभाजी चौकाचे अजूनपर्यंत सुशोभिकरणास सुरुवात नाही नक्की घोडे कुठे अडते हे प्रश्न विद्यमान नगरसेवकांनी सोडवणे गरजेचे आहे.

पेण शहरात बेशिस्तपणे पार्किंग, थ्री व्हीलर रिक्षा स्टॅन्ड व्यतिरिक्त जागोजागी थांबणे, अचानक कट मारणे, रस्त्यावर येणारे भाजी फळ विक्रेते, दुकानदाराने रस्त्यावर टाकलेल्या लोखंडी जाळ्या, दुकानदारांनी गाळ्या व्यतिरिक्त छप्पर टाकून रस्त्यावर वाढविलेले दुकान, पेण नगरपालिकेच्या गटारावर पडलेल्या अनधिकृत टपऱ्या, बेसुमार रस्ते जागोजागी रस्त्यावर पडलेले खड्डे, उघडी गटारे. यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. याची जबाबदारी प्रशासनाने घेऊन येत्या आठ दिवसात कोणती कार्यवाही करतात याकडे सामाजिक संस्था लक्ष ठेवून आहेत. अन्यथा पुढील काळात उग्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा सी. आर. म्हात्रे यांनी दिला आहे.









Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024